19 FEB 2017

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'ऑक्सफर्ड'च्या ज्ञानपंढरीत जाऊन ज्ञानमय झालो

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे; ऑक्सफर्ड विद्यापीठाचा यशस्वी संशोधन अभ्यास दौरा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

ऑक्सफर्ड विद्यापीठ ही ज्ञानाची पंढरी असून ज्ञान देणे आणि ज्ञान घेणे, एवढेच कार्य तेथे शतकानुशतके चालू आहे. इंग्लंडच्या ज्ञानाचे व संस्कृतीचे केंद्र असलेल्या ज्ञानपंढरीत राहून ज्ञानमय झालो, अशी भावना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी व्यक्त केली.

कुलगुरू डॉ. शिंदे हे युरोपियन युनियनच्या 'नमस्ते' प्रकल्पांतर्गत इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून एक महिना संशोधन करून नुकतेच परतले. त्यांच्या ऑक्सफर्ड येथील अनुभवाचा फायदा शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनींना मिळावा, यासाठी विद्यापीठाच्या कॉलोक्वियममध्ये विशेष व्याख्यान राजर्षी शाहू सभागृहात आयोजित करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते. तीन तास उपस्थितांना खिळवून ठेवणारे अभ्यासपूर्ण व विविध निरीक्षणांनी परिपूर्ण असे भाषण कुलगुरूंनी केले. ते म्हणाले, एक देश, एक भाषा, एक संस्कृती आणि एक कायदा अशा एकात्म सूत्रात ऑक्सफर्डमधील कारभार चालतो. तेथील शिस्त व संशोधन-अध्यापन संस्कृती अनुकरणीय आहे. संशोधन आणि अध्यापनाची सांगड घातली गेल्यानेच विद्यापीठातून आजपर्यंत ५०हून अधिक नोबेल विजेते व जागतिक स्तरावर गौरविलेले शास्त्रज्ञ, साहित्यिक, कलाकार निर्माण झाले. ऑक्सफर्डमध्ये व इंग्लंडमध्ये जनतेच्या प्राधान्यक्रमावर सर्वप्रथम देश असतो. त्यानंतर संस्था, कुटुंब आणि शेवटी 'मी' असतो. या 'मी'पणापासून मुक्ती मिळविण्याची शिकवण ऑक्सफर्डने दिल्याचे कुलगुरू म्हणाले.

ऑक्सफर्ड येथील समृद्ध ग्रंथालयांनी सर्वाधिक प्रभावित झाल्याचे सांगताना कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, दीड लाख लोकवस्तीच्या ऑक्सफर्ड गावात सुमारे १२५ ग्रंथालये असून जगातले सर्वात मोठे ग्रंथ भांडार एकवटले आहे. जमिनीवर जितकी इमारत दिसते, तितकेच ग्रंथागार जमिनीच्या खालीही असून भूमिगतरीत्या ही ग्रंथालये एकमेकांशी जोडलेली आहेत. मध्यवर्ती ग्रंथालयात सुमारे एक कोटी वीस लाख ग्रंथ असून १६२० पासून प्रसिद्ध झालेले प्रत्येक पुस्तक याठिकाणी उपलब्ध आहे. प्रचंड संग्रहातील कोणतेही पुस्तक तीन मिनिटांत वाचकाला उपलब्ध करून देण्यात येते. याप्रसंगी शिवाजी विद्यापीठाचा नावलौकिक सर्वदूर करण्यात मोलाची कामगिरी बजाविल्याबद्दल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचा विद्यापीठातर्फे शाल, श्रीफळ व छत्रपती शिवरायांचा पुतळा देऊन सत्कार करण्यात आला.



**कोल्हापूर : इंग्लंडच्या ऑक्सफर्ड विद्यापीठात व्हिजिटिंग स्कॉलर म्हणून संशोधन करून परतल्यावर दौऱ्याविषयीचे अनुभव सांगताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. समोर उपस्थित प्राध्यापक, प्रशासकीय अधिकारी, शिक्षकेतर कर्मचारी आदी. (छाया : तय्यब अली)**

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी पॉवरपॉईंट प्रेझेंटेशनद्वारे ऑक्सफर्ड विद्यापीठासह भेटी दिलेली अन्य विद्यापीठे, विविध शहरे, प्रयोगशाळा याबद्दलची रंजक माहिती दिली. बीसीयूडी संचालक डॉ.डी.आर. मोरे यांनी स्वागत केले. नंदिनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी ऑक्सफर्डच्या स्थापनेपासून १०९६ पासूनच्या तेथील विविध शैक्षणिक-सांस्कृतिक प्रथा-परंपरांची माहिती दिली. ज्ञानपंढरीला दरवर्षी जगभरातील ७० लाख लोक शैक्षणिक पंढरीच्या दर्शनासाठी भेट देतात. २२ हजार विद्यार्थी, १३ हजार कर्मचारी, १७,००० रोजगार, ४६०० व्यवसाय आदींच्या माध्यमातून अब्जावधी पौंडांची उलाढाल विद्यापीठात होत असल्याचे त्यांनी सांगितले. कुलगुरू पदावरील व्यक्तीने संशोधनासाठी म्हणून ऑक्सफर्डला येण्याचा भारताच्या व ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या इतिहासातील पहिलाच प्रसंग असल्याची माहिती ऑक्सफर्डच्या कुलगुरू प्रा. लुईस रिचर्डसन यांनी दिल्याचे कुलगुरूंनी सांगितले. याचे श्रेय स्कॉलरशीपचे महत्त्व ओळखून दौऱ्यास अनुमती देणारे कुलपती सी. विद्यासागर राव यांच्यासह युरोपियन युनियन, राज्य शासन व परराष्ट्र मंत्रालयाचेही कुलगुरूंनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

19 FEB 2017 पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू असून, मुख्य प्रशासकीय इमारतीस रंगरंगोटी करताना कर्मचारी. (छाया : तय्यब अली)

# शिवाजी विद्यापीठात दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी

## रंगरंगोटी, मंडप उभारणी सुरू; ५० हजार पदव्यांचे होणार वाटप

कोल्हापूर : प्रतिनिधी

शिवाजी विद्यापीठाच्या ५३ व्या दीक्षांत समारंभाची जय्यत तयारी सुरू झाली आहे. विद्यापीठ मुख्य इमारत रंगरंगोटीसह परीक्षा भवन परिसरात मंडप उभारण्यात येत आहेत. यावर्षी दीक्षांत समारंभात सुमारे ५० हजार पदव्यांचे वाटप करण्यात येणार असून, २३ हजार विद्यार्थी उपस्थित राहून पदव्या स्वीकारणार आहेत.

दीक्षांत समारंभ दि. २४ फेब्रुवारी रोजी लोककला केंद्राच्या सभागृहात होणार आहे. राजीव गांधी विज्ञान व प्रौद्योगिकी आयोगाचे अध्यक्ष, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे असतील. स्वागतापासून ते मंडप उभारणीपर्यंतच्या २० कमिट्या नियुक्त करण्यात आल्या आहेत. विविध अभ्यासक्रमांच्या पदव्यांची छपाई अंतिम टप्प्यात आली आहे.

दीक्षांत समारंभात गुरुवारी (दि. २३) सकाळी १० वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. सकाळी ११ वाजता शाहीर आझाद लोककला सांस्कृतिक मंचतर्फे 'लेणं महाराष्ट्राचं' हा सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. शुक्रवारी (दि. २४) सकाळी ८ वाजता कमला कॉलेजपासून ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे.

### 'डीओटी'च्या विद्यार्थ्यांना मिळणार ऑनलाईन पदव्या

दीक्षांत समारंभात यावर्षी तंत्रज्ञान अधिविभागात (डीओटी) शिकणाऱ्या अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना छापील व ऑनलाईन पदव्या प्रदान करण्यात येणार आहेत. केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' उपक्रमांतर्गत उपक्रम राबविण्यात येत असून, सीडीसीएल कंपनीशी करार करण्यात आला आहे. यापुढील काळात नऊ प्रकारची शैक्षणिक प्रमाणपत्रे, गुणपत्रके, मायग्रेशन प्रमाणपत्रे ऑनलाईन देण्यात येणार आहेत. यासाठी विद्यार्थ्यांना लॉगीन आयडी व पासवर्ड देण्यात आले आहेत. पदव्यांचे ऑनलाईन व्हेरिफिकेशनही विद्यार्थ्यांना करता येणार आहे. यामुळे परीक्षांमधील गैरप्रकार थांबण्यास मदत होणार आहे.

19 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

Times of India

# 'How to vote' guide for SUK students via YouTube

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Lack of a voter ID should not stop any youth from casting their vote for the upcoming Zilla Parishad and Panchayat Samiti polls.

This was an appeal made by district collector Amit Saini while talking to the students of the Shivaji University, Kolhapur on Friday. He participated in an interactive session with the students through a video conference from his channel on YouTube.

Saini said, "Without stating any excuses, the students should participate in the voting process. Those who do not have a voting card, are given a voting slip. Just in case even a voting slip is not provided to them, the voter can use their photo ID for the voting process. Those who do not find their name in the voting list can download the 'True voter' mobile application or directly log on to the *sec.maharashtra.gov.in* website to get to know about their name and the polling station where they should go to."

TOI




Amit Saini appealed to the students to cast their vote with a photo ID if they did not have a voter ID yet

The district collector appealed to all the students to create voting awareness among their friends and relatives before the polling day on February 21.

For the first-time voters, Saini said that the representatives of the election commission would be able to help them through the entire process.

"One should press the first button for the ZP and second button for the Panchayat Samiti elections. From this year, the election commission has put up flex boards of the candidates with their educational qualification, criminal background and the financial assets, for the ease of the voters," Saini said.

He thanked the vice-chancellor Devanand Shinde and registrar Vilas Nandavadekar for their support in the process.

19 FEB 2017

Times of India

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# SUK forms cluster of colleges to appoint examination supervisors

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) has formed cluster of colleges for the upcoming summer examination that is scheduled to commence from March 24.

According to Mahesh Kakade, controller of examinations, SUK, the attendance of the supervisors has always posed a serious question mark during every semester examination and this step will help resolve the issue.

"The senior supervisor position requires senior authorities from colleges and the university department. However, it has been found out that many of the senior authorities are unwilling to participate, resulting in the last-minute burden on few people. The formation of cluster is necessary considering the depleting number of supervisors during the exam," he said.



TOI

The attendance of the supervisors has always posed a serious question mark during every semester examination

Kakade said now every cluster will have a lead college or department that will look after the supervisor requirement in their cluster during the semester examinations. They will have to manage the supervisors and assign their duties that will ensure the exam process goes on smoothly.

"We have divided the examination in five sessions. The first session will commence from March 24 and will conclude on April 8, while the next session will commence from April 10 and will conclude on April 22. The last session will commence from May 22 and conclude on June 3," said Kakade.

**March/April semesters**

**Session Period:**
March 24-April 4 12
April 10- April 22 10
April 24- May 6 11
May 8-May 20 10
May 22-June 3 12

**Clusters in division:**
In Kolhapur: 16
In Sangli: 12
In Satara: 11

He added, "The varsity, through a circular, has asked the coordinator of the cluster to hold a meeting with principals or the head of the departments about appointing supervisors for exam duties so that the last minute chaos is avoided. The list of appointed senior supervisors has been asked to be submitted to the exam department as well."

According to Kakade, supervisors get their honorarium for the examination duties including the travelling allowance. This work involves participation of at the most five days for an examination session.

"We have some 284 examination centres across the Kolhapur, Sangli and Satara districts and 40 departments on the campus. For smooth conduct of the exam, we need at least 325 supervisors and the cluster process will help in streamlining the process," he said.

Another SUK official said that during winter examination in 2016, university had faced issues relating to the appointments of senior supervisors. Hence, the step of appointment through cluster colleges was taken.

19 FEB 2017

जनसंपर्क कक्ष
पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निर्भयपणे मतदान करा

## जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांचे आवाहन

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
मतदान प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने प्रयत्न केले आहेत. मतदानापासून कोणीही वंचित राहू नये, याची दक्षता घेण्यात आली आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने दि. २१ फेब्रुवारी रोजी निर्भयपणे मतदान करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी यांनी केले.

जिल्हा प्रशासन आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी सकाळी व्हिडीओ कॉन्फरन्सिंग तसेच यू-ट्यूबद्वारे शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील २८० महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी डॉ. सैनी यांनी संबोधित केले. सर्व विद्यार्थ्यांनी कोणत्याही कारणाने मतदान प्रक्रियेपासून दूर राहू नये. मतदान करावेच, असे आवाहनही त्यांनी या प्रसंगी केले. त्यांच्याबरोबर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनीही विद्यार्थी, शिक्षकांना संबोधित केले.

डॉ. सैनी म्हणाले, जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीसाठी दि. २१ फेब्रुवारीला मतदान होणार आहे. प्रत्येकाने मतदान केल्यास लोकशाही सुदृढ होईल.

आपले नाव मतदान यादीत नसल्यास ट्रू व्होटर ॲप्लिकेशनद्वारे स्मार्टफोनच्या मदतीने डाऊनलोड करा, अथवा इंटरनेटच्या सुविधेचा वापर करून वेबसाईटवरील मतदार यादीत आपले नाव शोधू शकता. त्यामुळे आपले नाव कोणत्या पोलिंग स्टेशनशी जोडलेले आहे हेही कळेल. सर्वांनी मतदान करावयाचे आहे, तसेच आपण आपल्या कुटुंबीयांना, मित्रांना मतदान करण्याचे आवाहन करावे. व्होटिंग मशीनचे पहिले बटण जिल्हा परिषदेसाठी तर दुसरे बटण पंचायत समिती उमेदवाराला मत देण्यासाठी दाबावयाचे आहे.

19 FEB 2017

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अहिल्याबाई होळकर असामान्य स्त्री

## - डॉ. संजय सोनवणी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

अहिल्याबाई होळकर ही मध्ययुगीन भारतातली ती एक युद्धकुशल, स्वतंत्रतावादी, कायदेतज्ज्ञ, रसिक-गुणग्राहक, उद्योगांचे महत्त्व समजणारी अशी असामान्य स्त्री होती, असे प्रतिपादन होळकरांच्या इतिहासाचे अभ्यासक संजय सोनवणी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यासन व सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्राच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर : एक विचार' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते.

सोनवणी म्हणाले, मध्ययुगीन कालखंडात स्त्रियांचे जीवन रूढी-परंपराच्या चौकटीमध्ये बांधले गेले होते. स्त्रियांच्या पायाचे नखदेखील कुणाला दिसू नये इतके त्यांना पडदानशीन केले गेले होते, पण त्याच काळात परंपरेची बंधने झुगारून देणारी आणि प्रसंगी सनातन्यांचा रोष ओढवून घेणारी अहिल्यादेवीही आपल्याला दिसते. जी खरे तर स्वतः एका वंचित समाजातली स्त्री. परंतु केवळ आत्मविश्वास आणि धडाडीच्या जोरावर अहिल्यादेवींनी स्वतःला मिळालेल्या संधीचे सोने केले.

आपल्या राज्यात विधवांना दत्तकपुत्र घेण्याचा अधिकार देणे, बालविवाहास प्रतिबंध करणे, स्त्रियांचे स्वतंत्र सैनिक प्रशिक्षण केंद्र काढणे व स्त्रियांची बटालियन स्थापन करणे किंवा महिला विणकरांना प्रोत्साहन देणे आणि एका अर्थाने वस्त्रोद्योग व्यवसायाचा पाया घालणे यासारखी त्यांनी महिला सक्षमीकरणासाठी केलेली कामे ही त्यांची दूरदृष्टी आणि कर्तृत्व याची साक्ष देतात. वंचित समाजात जन्माला येऊनही, वंचिततेवर मात करून वंचित समूहांसाठी कार्य केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांवर आजही अधिकृत चरित्रग्रंथ उपलब्ध नाही याची खंतही त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविक डॉ. नंदा पारेकर यांनी केले. प्रा. अविनाश भाले यांनी परिचय करून दिला व डॉ. निलिशा देसाई यांनी आभार मानले. यावेळी डॉ. अवनीश पाटील, डॉ. निलांबरी जगताप, डॉ. चांगदेव बंडगर, रावसाहेब पुजारी, दशरथ पारेकर, अमोल पांढरे आदी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या संयोजनासाठी किशोर खिलारे, शरद पाटील, श्रीधर साळोखे यांनी सहकार्य केले.